महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
☎ ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल ✉: cpromhadaoffice@gmail.com

=======================================================================

जावक क्रमांक – ८२/ ३४२६१५९ दिनांक :- ७ सप्टेंबर, २०२६

**प्रसिद्धिपत्रक**

## म्हाडा डिजिटल गणेशोत्सव-२०२६ 'गणेशोत्सव आपल्या घराचा, उत्सव म्हाडा परिवाराचा!'

## 'डिजीम्हाडा' ॲपवर म्हाडाच्या डिजिटल गणेशोत्सव स्पर्धेचा शुभारंभ

मुंबई, दि. ७ सप्टेंबर, २०२६ : म्हाडाच्या विविध अभिन्यासांतील वसाहतींमध्ये गणेशोत्सव साजरा करणाऱ्या गणेशभक्तांच्या उत्साहाला प्रोत्साहन देतानाच त्यांच्या सर्जनशीलतेला, सामाजिक बांधिलकीला आणि पर्यावरणपूरक उपक्रमांना व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी 'म्हाडा डिजिटल गणेशोत्सव २०२६ – गणेशोत्सव आपल्या घराचा, उत्सव म्हाडा परिवाराचा!' या अभिनव स्पर्धेचा आज 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) यांच्या हस्ते 'डिजीम्हाडा' ॲपवर गो-लाईव्ह करून शुभारंभ करण्यात आला.

म्हाडाच्या राज्यभरातील विविध मंडळांच्या अभिन्यासांमध्ये तसेच म्हाडा वसाहतींमध्ये सार्वजनिक आणि वैयक्तिक स्तरावर गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या उत्सवातील वैविध्यपूर्ण संकल्पना, आकर्षक सजावट, सामाजिक उपक्रम, सांस्कृतिक परंपरा आणि पर्यावरणपूरक प्रयत्नांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. 'डिजीम्हाडा'च्या माध्यमातून म्हाडा परिवारातील गणेशोत्सवाच्या या उत्सवी परंपरेला डिजिटल व्यासपीठ मिळणार आहे.

म्हाडाच्या विविध विभागीय मंडळांच्या कार्यक्षेत्रातील गणेशोत्सव मंडळे तसेच वैयक्तिक पातळीवर गणेशोत्सव साजरा करणारे म्हाडा रहिवासी या स्पर्धेत सहभागी होऊ शकतील. स्पर्धकांना 'डिजीम्हाडा' ॲपच्या माध्यमातून ऑनलाइन नोंदणी करून आपल्या गणेशोत्सवाची वैशिष्ट्ये सादर करता येणार आहेत.

नोंदणीच्या वेळी स्पर्धकाचे नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक, संबंधित म्हाडा वसाहत अथवा अभिन्यासाचे नाव आणि गणेशोत्सवाचा प्रकार यासंबंधीची माहिती भरावी लागणार आहे. त्यानंतर गणेशमूर्ती, सजावट आणि गणेशोत्सवाची वैशिष्ट्ये दर्शविणारी छायाचित्रे तसेच कमाल दोन मिनिटांचा व्हिडिओ ॲपवर अपलोड करता येणार आहे.

स्पर्धेचे आयोजन म्हाडाच्या राज्यातील विविध विभागीय मंडळांच्या कार्यक्षेत्रानुसार जिल्हानिहाय करण्यात येणार आहे. मुंबई विभागाचे मुंबई शहर आणि मुंबई उपनगर असे दोन स्वतंत्र विभाग करण्यात येणार आहेत. त्यामुळे राज्यभरातील म्हाडा परिवाराला आपल्या गणेशोत्सवातील वैशिष्ट्यपूर्ण संकल्पना, सजावट आणि सामाजिक उपक्रम महाराष्ट्रासमोर डिजिटल माध्यमातून मांडण्याची संधी मिळणार आहे. या स्पर्धेत पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. गणेशोत्सवाचे परीक्षण करताना नैसर्गिक व पुनर्वापर करता येणाऱ्या साहित्याचा वापर, प्लास्टिकचा कमीत कमी वापर, पर्यावरणपूरक सजावट, जलसंवर्धन, निर्माल्य व्यवस्थापन, ध्वनिप्रदूषणाला आळा घालण्याचे प्रयत्न तसेच सामाजिक व जनजागृतीपर संदेश देणाऱ्या सजावटीचा विचार केला जाणार आहे.

'हरित गणेशोत्सव – स्वच्छ गणेशोत्सव' या संकल्पनेला प्रोत्साहन देत पर्यावरणाचे संवर्धन आणि सामाजिक जाणीव जपत गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन म्हाडाच्या वतीने करण्यात आले आहे. स्पर्धेतील विजेत्यांची निवड सर्वाधिक मिळालेल्या मतांच्या आधारे केली जाईल. तसेच स्पर्धेतील विविध विभागांमधून उत्कृष्ट गणेशोत्सवांची निवड करून विजेत्यांना आकर्षक पारितोषिके आणि सन्मानचिन्हे देऊन गौरविण्यात येणार आहे. सर्जनशीलता, सामाजिक बांधिलकी, पर्यावरणपूरकता, सजावट आणि उत्सवाचे वैशिष्ट्यपूर्ण सादरीकरण या विविध निकषांच्या आधारे स्पर्धेतील प्रवेशिकांचे परीक्षण करण्यात येणार आहे. म्हाडाच्या या उपक्रमामुळे गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक एकोपा, सांस्कृतिक वारसा, सर्जनशीलता आणि पर्यावरण संवर्धन यांचा संदेश अधिक व्यापक पातळीवर पोहोचवण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर म्हाडाच्या विविध वसाहतींमध्ये राहणाऱ्या कुटुंबांना डिजिटल माध्यमातून एकत्र आणण्याचा हा उपक्रम ठरणार आहे. 'डिजीम्हाडा' च्या माध्यमातून म्हाडा परिवाराला जोडणाऱ्या या अभिनव उपक्रमात राज्यभरातील म्हाडा रहिवासी, गणेशोत्सव मंडळे आणि गणेशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि आपल्या गणेशोत्सवाची वैशिष्ट्ये संपूर्ण महाराष्ट्रासमोर डिजिटल माध्यमातून सादर करावीत, असे आवाहन म्हाडाच्या वतीने करण्यात आले आहे.

###

स्वाक्षरीत/-
(वैशाली गडपाले)
**मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा**

---

**सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

D:\Documents\Press Release\2026\82 'डिजीम्हाडा' ॲपवर म्हाडाच्या डिजिटल गणेशोत्सव स्पर्धेचा शुभारंभ.docx

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra
East, Mumbai-400051.☎022-55405066/77. Email :cpromhadaoffice@gmail.com

=====================================================

Outward No. : 82/ 3426159 Dt. **7** September, 2026

**Press Release**

**MHADA Digital Ganeshotsav 2026**
**'Ganeshotsav in Our Homes, A Celebration of the MHADA Family!'**

# Digital Ganeshotsav Competition Launched on the DiGiMHADA App

**Mumbai, September 7, 2026:** To encourage the enthusiasm of devotees celebrating Ganeshotsav across various MHADA layouts and residential colonies, while providing a wider platform for their creativity, social commitment and eco-friendly initiatives, the innovative competition **'MHADA Digital Ganeshotsav 2026 – Ganeshotsav in Our Homes, A Celebration of the MHADA Family!'** was launched today on the **DiGiMHADA App** by Shri Sanjeev Jaiswal, IAS, Vice President and Chief Executive Officer, MHADA.

Ganeshotsav is celebrated with great enthusiasm at both public and individual levels across MHADA layouts and residential colonies under the jurisdiction of its various regional boards throughout the State. The competition has been organised to encourage and showcase the diverse concepts, attractive decorations, social initiatives, cultural traditions and eco-friendly efforts associated with these celebrations. Through DiGiMHADA, this festive tradition of the MHADA family will now receive a digital platform.

Ganeshotsav mandals within the jurisdiction of MHADA's various regional boards, as well as MHADA residents celebrating the festival at an individual level, will be eligible to participate in the competition. Participants can register online through the DiGiMHADA App and submit the distinctive features of their Ganeshotsav celebrations.

At the time of registration, participants will be required to provide details such as their name, address, mobile number, the name of the concerned MHADA colony or layout, and the category of Ganeshotsav. Participants will subsequently be able to upload photographs showcasing the Ganesh idol, decorations and other distinctive features of their celebration, along with a video of up to two minutes through the app.

The competition will be organised district-wise according to the jurisdiction of MHADA's various regional boards across the State. The Mumbai region will have two separate divisions—Mumbai City and Mumbai Suburban. This will provide the MHADA family across Maharashtra with an opportunity to digitally showcase their unique concepts, decorations and social initiatives associated with Ganeshotsav before the people of the State.

Special emphasis has been placed on eco-friendly Ganeshotsav celebrations. The evaluation will take into consideration the use of natural and recyclable materials, minimum use of plastic, eco-friendly decorations, water conservation, management of *nirmalya* (floral and other ritual offerings), efforts to control noise pollution, as well as decorations conveying social and public awareness messages.

Promoting the concept of **'Green Ganeshotsav – Clean Ganeshotsav'**, MHADA has appealed to residents and Ganesh devotees to celebrate the festival while protecting the environment and upholding social responsibility.

Winners of the competition will be selected on the basis of the highest number of votes received. Outstanding Ganeshotsav celebrations from various categories will also be selected, and the winners will be felicitated with attractive prizes and mementoes.

Entries will be assessed on various parameters, including creativity, social commitment, environmental sustainability, decoration and the distinctive presentation of the festival.

Through this initiative, MHADA aims to spread the message of social harmony, cultural heritage, creativity and environmental conservation through the celebration of Ganeshotsav on a wider scale. The initiative will also serve as a digital platform to bring together families residing in various MHADA colonies.

MHADA has appealed to its residents, Ganeshotsav mandals and Ganesh devotees across the State to participate in large numbers in this innovative initiative through DiGiMHADA and digitally present the unique features of their Ganeshotsav celebrations before the people of Maharashtra.

###

Sd/-
(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer / MHADA

---

**Follow us on :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
☎ ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल ✉: cpromhadaoffice@gmail.com

==================================================================

Outward No. : 82/ 3426159 Dt. **7** September, 2026

**प्रेस विज्ञप्ति**

# म्हाडा डिजिटल गणेशोत्सव-2026 'गणेशोत्सव अपने घर का, उत्सव म्हाडा परिवार का!'

'डिजीम्हाडा' ऐप पर म्हाडा की डिजिटल गणेशोत्सव प्रतियोगिता का शुभारंभ

**मुंबई, 7 सितंबर, 2026:** म्हाडा के विभिन्न अभिन्यासों और आवासीय परिसरों में गणेशोत्सव मनाने वाले गणेश भक्तों के उत्साह को प्रोत्साहित करने के साथ-साथ उनकी रचनात्मकता, सामाजिक प्रतिबद्धता और पर्यावरण-अनुकूल पहलों को व्यापक मंच उपलब्ध कराने के उद्देश्य से **'म्हाडा डिजिटल गणेशोत्सव-2026 – गणेशोत्सव अपने घर का, उत्सव म्हाडा परिवार का!'** इस अभिनव प्रतियोगिता का आज म्हाडा के उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) के करकमलों द्वारा **'डिजीम्हाडा' ऐप** पर शुभारंभ किया गया।

राज्यभर में म्हाडा के विभिन्न मंडलों के कार्यक्षेत्रों में स्थित अभिन्यासों तथा म्हाडा आवासीय परिसरों में सार्वजनिक और व्यक्तिगत स्तर पर गणेशोत्सव बड़े उत्साह के साथ मनाया जाता है। इस उत्सव से जुड़ी विविध संकल्पनाओं, आकर्षक सजावट, सामाजिक पहलों, सांस्कृतिक परंपराओं और पर्यावरण-अनुकूल प्रयासों को प्रोत्साहित करने के उद्देश्य से इस प्रतियोगिता का आयोजन किया गया है। 'डिजीम्हाडा' के माध्यम से म्हाडा परिवार की गणेशोत्सव की इस उत्सवपूर्ण परंपरा को एक डिजिटल मंच उपलब्ध होगा।

म्हाडा के विभिन्न प्रादेशिक मंडलों के कार्यक्षेत्र में आने वाले गणेशोत्सव मंडल तथा व्यक्तिगत स्तर पर गणेशोत्सव मनाने वाले म्हाडा निवासी इस प्रतियोगिता में भाग ले सकेंगे। प्रतियोगी 'डिजीम्हाडा' ऐप के माध्यम से ऑनलाइन पंजीकरण कर अपने गणेशोत्सव की विशेषताएं प्रस्तुत कर सकेंगे।

पंजीकरण के समय प्रतियोगी को अपना नाम, पता, मोबाइल नंबर, संबंधित म्हाडा आवासीय परिसर अथवा अभिन्यास का नाम तथा गणेशोत्सव के प्रकार से संबंधित जानकारी भरनी होगी। इसके पश्चात गणेश प्रतिमा, सजावट और गणेशोत्सव की विशेषताओं को दर्शाने वाले छायाचित्रों के साथ-साथ अधिकतम दो मिनट का वीडियो ऐप पर अपलोड किया जा सकेगा।

इस प्रतियोगिता का आयोजन राज्य में म्हाडा के विभिन्न प्रादेशिक मंडलों के कार्यक्षेत्र के अनुसार जिलावार किया जाएगा। मुंबई विभाग को **मुंबई शहर** और **मुंबई उपनगर**—इन दो स्वतंत्र विभागों में विभाजित किया गया है। इससे राज्यभर के म्हाडा परिवार को अपने गणेशोत्सव की विशिष्ट संकल्पनाएं, सजावट और सामाजिक पहलों को डिजिटल माध्यम से पूरे महाराष्ट्र के समक्ष प्रस्तुत करने का अवसर मिलेगा।

इस प्रतियोगिता में पर्यावरण-अनुकूल गणेशोत्सव को विशेष महत्व दिया गया है। गणेशोत्सव के मूल्यांकन के दौरान प्राकृतिक एवं पुन: उपयोग योग्य सामग्रियों का उपयोग, प्लास्टिक का न्यूनतम उपयोग, पर्यावरण-अनुकूल सजावट, जल संरक्षण, निर्माल्य प्रबंधन, ध्वनि प्रदूषण को नियंत्रित करने के प्रयास तथा सामाजिक एवं जनजागरूकता का संदेश देने वाली सजावट जैसे विभिन्न पहलुओं पर विचार किया जाएगा।

**'हरित गणेशोत्सव – स्वच्छ गणेशोत्सव'** की संकल्पना को प्रोत्साहित करते हुए म्हाडा ने पर्यावरण संरक्षण और सामाजिक जिम्मेदारी का ध्यान रखते हुए गणेशोत्सव मनाने का आह्वान किया है। प्रतियोगिता के विजेताओं का चयन सर्वाधिक प्राप्त मतों के आधार पर किया जाएगा। साथ ही, विभिन्न श्रेणियों से उत्कृष्ट गणेशोत्सवों का चयन कर विजेताओं को आकर्षक पुरस्कार एवं स्मृति चिह्न प्रदान कर सम्मानित किया जाएगा।

प्रतियोगिता में प्राप्त प्रविष्टियों का मूल्यांकन रचनात्मकता, सामाजिक प्रतिबद्धता, पर्यावरण-अनुकूलता, सजावट तथा उत्सव की विशिष्ट प्रस्तुति जैसे विभिन्न मानदंडों के आधार पर किया जाएगा।

म्हाडा के इस पहल से गणेशोत्सव के माध्यम से सामाजिक सद्भाव, सांस्कृतिक विरासत, रचनात्मकता और पर्यावरण संरक्षण का संदेश व्यापक स्तर तक पहुंचाने में सहायता मिलेगी। साथ ही, यह पहल म्हाडा की विभिन्न आवासीय कॉलोनियों में रहने वाले परिवारों को डिजिटल माध्यम से एक साथ जोड़ने का कार्य करेगी।

'डिजीम्हाडा' के माध्यम से म्हाडा परिवार को जोड़ने वाली इस अभिनव पहल में राज्यभर के म्हाडा निवासी, गणेशोत्सव मंडल और गणेश भक्त बड़ी संख्या में सहभागी हों तथा अपने गणेशोत्सव की विशेषताओं को डिजिटल माध्यम से पूरे महाराष्ट्र के समक्ष प्रस्तुत करें, ऐसा आह्वान म्हाडा की ओर से किया गया है।

###

Sd/-
(वैशाली गडपाले)
**मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा**




महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
DiGiMHADA
म्हाडा
MHADA
MHADA DIGITAL
GANESHUTSAV 2026
गणेशोत्सव आपल्या घराचा...
उत्सव म्हाडा परिवाराचा
GO LIVE
उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
Curtain Raiser video
Vishal Deshmukh
VP & CEO MHADA
Dr. Vijay Ingole CO MHADA
CO MHADA PUNE
CO Mhada Nashik


म्हाडा
MHADA
DiGiMHADA
म्हाडा डिजिटल
गणेशोत्सव
२०२६
DiGiMHADA वरून स्पर्धेत सहभागी होण्याची प्रक्रिया
१
DiGiMHADA ॲपवर लॉगिन करा
आपला नंबर टाकून ॲपवर लॉगिन करा
२
गणेशोत्सव स्पर्धा उघडा
DiGiMHADA ॲपमध्ये गणेशोत्सव स्पर्धा निवडा.
३
फोटो अपलोड करा
आपल्या गणपती आणि सजावटीचा फोटो अपलोड करा.
४
आवश्यक माहिती भरा
आपले इतर आवश्यक तपशील भरा.
५
सबमिट करा
सबमिट करून स्पर्धेत आपला सहभाग नोंदवा!
QR कोड स्कॅन करून
DiGiMHADA ॲप
डाउनलोड करा.
GET IT ON Google Play
Download on the App Store
माझं घर
माझा उत्सव
माझा अभिमान